**मा. जिल्हाधिकारी वाशिम यांच्या अध्यक्षतेखाली दि. १०/०४/२०१२ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त**

| अ.क्र. उपस्थित अधिकारी/पदाधिकारी | हुददा व कार्यालय/विभाग | |
|---|---|---|
| १. मा.श्री रामचंद्र कुळकर्णी | जिल्हाधिकारी, वाशिम | अध्यक्ष |
| २. श्री अशोक चौधरी | प्रादेशिक अधिकारी, मऔविम अमरावती | सदस्य |
| ३. श्री रा.म.चिखलवार | उपअभियंता मऔविम, अकोला | सदस्य |
| ४. श्री एस एन गायकवाड | स.अ.उपविभाग क्र २ मऔविम अकोला | सदस्य |
| ५. श्री एस पी राउत | क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम अकोला | सदस्य |
| ६. श्री विनायक मुरमकर | क्षेत्र व्यवस्थापक मऔविम वाशिम | सदस्य |
| ७. श्री एस पी वानखडे | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी वाशिम | सदस्य |
| ८. श्री एम एस कढाणे | क्षेत्र अधिकारी एमपीसीबी अमरावती | सदस्य |
| ९. श्री के के राठोड | सरकारी कामगार अधिकारी वाशिम | सदस्य |
| १०.श्री जी व्ही इंगळे | सहा.संचालक,रोजगार स्वयंरोजगार | सदस्य |
| ११. श्री एम बी धाबर्डे | उपकार्यकारी अभियंता मऔविम वाशिम | सदस्य |
| १२. श्री रमेशचंद्रजी इन्नानी | अध्यक्ष स्मॉल स्केल इंडस्ट्रीज वाशिम | सदस्य |
| १३. श्री निरंजन गाठेकर | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र वाशिम | सदस्यसचिव |

सर्वप्रथम महाव्यवस्थापक जि.उ.के. वाशिम यांनी सर्व उपस्थित सभासदांचे मा.अध्यक्षमहोदयांचे वतीने स्वागत केले व मा.अध्यक्षमहोदयांचे परवानगीने सभेस सुरुवात करण्यात आली.

**विषय क्र १- वाशिम जिल्हयात उद्योगास चालना देण्याचे दृष्टीने जिल्हयातील एमआयडीसी चाआढावा घेणे-**

सभेमध्ये मा.अध्यक्षांनी वाशिम जिल्हयातील सर्व औद्योगिक क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतला. प्रादेशिक अधिकारी, मऔविम यांनी जिल्हयातील वाशिम औद्योगिक क्षेत्रात २१९.१३ हेक्टर आर इतकी जमीनीचा ताबा महामंडळास प्राप्त झाला असून पहिल्हया टप्यात ४० हेक्टर क्षेत्र विकसीत करण्यात आले. सद्यस्थितीत वाशिम औ क्षेत्रात एकुण ९७ भुखंड पाडण्यात आले असून त्यापैकी ४१ भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे. व ५६ भुखंड वाटपासाठी उपलब्ध असल्याचे सांगीतले. तसेच भुखंड वाटप केलेल्या परंतु ५ वर्ष होवूनही बांधकाम न केलेल्या २८ लोकांना नोटीस दिल्या असून त्यापैकी ९ लोकांनी भुखंड महामंडळास परत केले आहे. उर्वरीत १९ भुखंड परत घेण्याची कार्यवाही सुरु असल्याचे सांगीतले त्यावर अध्यक्षांनी १२ ते १३ दिवसात

भुखंड परत घेवून इच्छुक लोकांना भुखंड वाटपासाठी खुले करण्याचे निर्देश प्रादेशिक अधिकारी मऔविम अमरावती यांना दिले. तसेच आज रोजी एमआयडीसीकडे वाटपासाठी किती भुखंड शिल्लक असल्याची विचारणा केली. त्यावर प्रादेशिक अधिकारी मऔविम अमरावती यांनी एकुण ४४ भुखंड वाटपास उपलब्ध असल्याचे सांगीतले.

तसेच मंगरुळपीर येथे ३५ भुखंडापैकी २९ भुखंड तत्कालीन प्रभारी क्षेत्र व्यवस्थापक एमआयडीसी यांनी अनाधिकृतपणे आवंटीत केल्याचे सांगुन जिल्हा उद्योग कंद्राचे क्षेत्रात ६ भुखंड वाटपाकरीता उपलब्ध असल्याचे सांगीतले.

रिसोड तालुक्यात ११.३५ हेक्टर आर जमीन ताब्यात घेतली असून त्यावर अतिक्रमण करण्यात आल्याने प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे सभेत सांगीतले.

मालेगाव तालुक्यात २०.८० हे आर जमीन संपादन केली असून त्यापैकी १ भुखंड औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस वाटप करण्यात आल्याचे सांगीतले.

मानोरा तालुक्यांत १५ हेक्टर जागा ताब्यांत घेतल्याचे व ३ प्लॉट वाटप करण्यात आल्याचे सभेत सांगण्यांत आले.

मंगरुळपीर तालुक्यांत ३५ प्लॉटपैकी ३४ प्लॉट वाटप करण्यांत आले. यामध्येसुध्दा अनधिकृत वाटप झालेल्या प्लॉटची चौकशी करुन मागणी नुसार प्लॉट वाटपाचे काम एका महिन्याचे आंत सुरु करा असे आदेश देण्यांत आले.

कारंजा येथे एमआयडीसी सुरु करण्याबाबत अध्यक्षांनी सभेत विचारले असता मऔविम अधिका-यांनी मुख्यालयाची परवानगी घेण्यात येवून नव्याने जमीन संपादन करण्याची कार्यवाही करण्यात येईल असे सांगीतले.

**<u>विषय क्र २</u>-** दिनांक १०.५.२०१० रोजी जिउमि समितीमध्ये झालेल्या चर्चेवर केलेल्या कार्यवाहीचा वाढावा घेणे-

महाबीजचे प्रतिनिधी यांनी लोडशेडींगमुळे विज पुरवठा मिळत नसून पाणि पुरवठा होत नसल्याचे सांगीतले त्यावर मऔविम चे अधिका-यांनी महाबीजने सर्व्हीस चार्जेस व डेव्हलपमेंट चार्जेस भरला नसल्याचे सांगीतले त्यावर मा. अध्यक्षांनी महाबीज ला पत्र देण्यात येवून त्याची कॉपी जिल्हा उद्योग केंद्रास देण्याचे निर्देश मऔविम अधिका-यांना दिले.

**विषय क्र ३- अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे विषयावर चर्चा-**

शेवटी मा.अध्यक्षांचे परवानगीने  सभेची सांगता करण्यात आली.

स्वा/-
महाव्यवस्थापक तथा
सदस्यसचिव, जिउमि समिती, वाशिम

स्वा/-
मा. जिल्हाधिकारी
जिल्हा उद्योग मित्र समिती, वाशिम